# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S. (पोलीस ठाणे):** महात्मा गांधी चौक  **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0314  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/10/2026 07:39 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार  **Date from (दिनांक पासून):** 31/08/2026  **Date To (दिनांक पर्यंत):** 31/08/2026

**Time Period (कालावधी):**  **Time From (वेळेपासून):** 15:44 तास  **Time To (वेळेपर्यंत):** 18:03 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):**  **Date (दिनांक):** 16/10/2026  **Time (वेळ):** 06:51 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):**  **Entry No. (नोंद क्र.):** 008  **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 16/10/2026 06:51 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 02 कि.मी.  **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सहनिबंधक सहकारी संस्था दुग्ध, सांगली, मिरज कार्यालय येथे,



Scanned with OKEN Scanner

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1986

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, सांगली शहर, सांगली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, सांगली शहर, सांगली, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9527904700



Scanned with OKEN Scanner

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश पाटील | | | 1. क्लार्क वर्ग 3,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्थादुग्ध सांगली,Town/Village (शहर / गाव): मिरज,रा- बागणी,ता वाळवा,Tehsil (तहसील): जिल्हा सांगली,Police Station (पोलीस ठाणे): महात्मा गांधी चौक,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरेश लोंढे पुर्ण नाव पत्ता नाही | | | 1. Town/Village (शहर / गाव): पुर्ण नाव पत्ता निष्पन्न नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): महात्मा गांधी चौक,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11.



Scanned with OKEN Scanner

Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

वर्दीजबाब ता- 16.10.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9527904700.

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 31/08/2026 रोजी तक्रारदार विरेंद्र किर्तीकुमार पाटील, वर्षे 25 वर्षे रा.शिराळा, ता.शिराळा, जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची श्री.सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविलेने त्यांना आम्ही पथकासह मिरज रस्त्यास असले क्रिडा संकुल सांगली येथे येत असलेच्या सुचना देवून आलेनंतर संपर्क केल्यानंतर हजर राहणेच्या व गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सांगली यांना पत्रव्यवहार करून दोन पुरूष कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना 14.00 वा.चे सुमारास एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.31/08/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 14.00 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, व ला.प्र.वि.पथक पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र.एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 14.00 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, पुष्पराज चौक, विश्रामबाग चौक, विजयनगर मार्गे सांगली ते मिरज रस्त्यास असले क्रिडा संकुल सांगली जवळ सुरक्षित ठिकाणी 14.30 वा.चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी तक्रारदार विरेंद्र पाटील यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील हे त्यांचेकडील सुझुकी सिलेरियो कार क्र. क्रमांक केए-24/एन-7457 मधुन आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांनी मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री.ऋषिकेश राजगे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. गणेश कुमठेकर यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. विरेंद्र पाटील यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांना श्री.पुनेश्वर मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या कामकाज बंद असलेस संस्थेचा सभासद व्हायचे असल्याने त्यांनी सदर संस्थेचे चेअरमन व सभासद यांनी संस्था पुर्नजिवन करणे बाबत दाखल केले अर्जा बाबत श्री.सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक,



Scanned with OKEN Scanner

सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज यांना भेटुन कामाचा पाठपुरावा केला असता त्यांनी पुर्नजीवन सुनावणी निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लागण्यासाठी मुंबईच्या कार्यालयातील साहेबांना 1,00,000/- रुपये व मुंबई कार्यालयातील क्लार्क कांबळे व इतर यांना 50,000/- रुपये तसेच मिरज कार्यालयातील स्टाफसाठी 50,000/- असे एकुण 2,00,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. त्यावेळी मी तक्रारी अर्ज वाचून सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करून लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील व पंच क्र.1 ऋषिकेश राजगे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य सुचना दिल्या.

त्यानंतर मी माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅम मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.44 वा सुरु करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून त्यांना लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क यांची सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज कार्यालय येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील हे त्यांचेकडील सुझुकी सिलेरियो कार क्र. क्रमांक केए-24/एन-7457 मधुन पंच नं.1 ऋषिकेश राजगे यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. विरेंद्र पाटील व पंच नं.1 ऋषिकेश राजगे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 18.03 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री.ऋषिकेश राजगे यांना, लोकसेवक श्री. सुरेश पाटील यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे कार पार्क करून सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज कार्यालय येथे दाखल झालो. तेव्हा तक्रारदार यांनी दोन मिनट मला वेळ द्या... दोन मिनट बोलुया असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "वकिलाच पाच तारीखा आटेंड करणार...... एका तारखेला वकिलाला पाच



Scanned with OKEN Scanner

अँन्टी करप्शन ब्यु
गन ब्युरो, सांगल
सांगली यांनी
रूध्द लाच
ना देवून
गंची
त

हजार द्यायला लागत्यात" असे म्हणुन "ऑफिसमध्ये व्यवसायाच म्हणण दिलय पाठवुन" "एक लाख रूपये साहेबाच" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी कुठल्या असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "वरच्या डि डि आर साहेबाच सही होणार" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना किती असे म्हणाले असता क्लार्क पाटील "एक" असे म्हणुन "चाळीस खालचा .... नोटीस काढायला" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी बर किती असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "एक तुम्ही दिलते........ परत हे किती झाल बघा टोटल .. एवढा खर्च हाय.." असे म्हणुन "दोन मिनट बसणेस सांगितले. त्यानंतर काही वेळात आणखी अनोळखी इसम तिथे आले तेव्हा क्लार्क पाटील यांनी जुन्या गेलेच्या फाईल बाबत तक्रारदार यांना सांगुन स्वतः मुंबईचे कार्यालयात जाणे बाबत सांगितले. तेव्हा अनोळखी इसम यांनी वर ऐकत नाहित ओ असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी, पण वर पैसे कोणाला द्यायला पाहिजे असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी मुंबई येथे होणा-या कामा बाबत चर्चा केली त्यानंतर लोकसेवक सुरेश पाटील यांनी आत्ता तुम्हाला सांगु का ... प्रशांत कांबळे कसा हाय मागल्या त्या वेळी मंशीच शिपाईला सुद्धा किती दयाव शिपाईल पैशे" असे म्हणाले तेव्हा अनोळखी इसम यांनी ति ह्यांची संस्था... आमदाराची, रोहित दादांची तेवढ आसताना त्यांनी सगळ....... त्यांचा प्रोटोकॉल करावच लागतय ऐवढ असे म्हणाले. त्यानंतर क्लार्क पाटील, अनोळखी इसम व तक्रारदार यांच्यात कामा विषयी चर्चा झाली. त्यानंतर क्लार्क पाटील यांनी तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने नोटीस बाबत चर्चा केली. "हि नोटीस आठ्ठावीस सात परत आली... त्यात जोगधन साहेबांची सहि..... आधी कटक दोन साहेबांची सहि... ते साहेब गेल बदलुन.... कटक दोन साहेबांनी ....किती दिड लाख रूपये ...आणी प्रशांत कांबळे पंचविस हजार मागत होते त्यावेळी" "आपल्या कामाला..... ते साहेब गेले बदलुन .. आता मासाळ जोगदन साहेब आले" "परवा बोलुन घेतल.... म्हणल एवढ होणार न्हाय.... त्यांना बोललोय एवढ्या एवढ्यात करा म्हणुन" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी ते किती म्हणत्यात असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यानी "आता हे जोगधन साहेब... त्यांनी मला आकडा सांगीतलाय... एक लाख रूपये साहेबाच, मला चाळीस हजार रूपये द्या.... आणी त्याला एक दहा हजार रुपये द्या..... एवढ दिड लाख.... मग म्हणल आम्ही झकमारी करून काय उपयोग हाय" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी दिड लाख पण मागतय असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "टोटल दिड लाख होत्यात" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार कोणाचे असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "साहेबाच एक लाख, जोगधनच वरच साहेब कोण आहेत ते साहेब ... ह्याच्या सहिच निकाल" तेव्हा तक्रारदार यांनी बर.. मी पहिला किती दिलते तुम्हाला असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "तुम्ही पहिल्यांदा एक लाख काय तर दिले होते पंचविस दिली होती, परत पंच्याहत्तर दिले त्यातला मला पहासष्ट माझ्याकड हायत त्यावेळी" तक्रारदार किती असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "तुम्ही पंचवीस मला कॅश दिला" "परतचे पच्यांहत्तर परत काय तर" "त्यातल मला पहासष्टच हायत" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी तुमच्याकड किती आले मग टोटल असे म्हणाले असता पहासष्टच, म्हणजे नंव्वद आले.. नव्वद मध्ये मी आता मला सांगा... पंचविस मध्ये ते माझ हाय म्हणुन.... तुम्ही जर गेला असता तर वकिल पन्नास साठ हजार असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी म्हणजे मी दिलेल पैसे कुठ गेलेत... म्हणजे वर दिलेत काय असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "माझ्याकड आहेत की अजुन... तुमचे ते आले कि एकत्र करून देणार" असे म्हणाले म्हणुन तक्रारदार यांनी कुठल्या कामासाठी असे विचारले असता क्लार्क पाटील



Scanned with OKEN Scanner

यांनी "साहेबाची सहि घ्यायलाच एक लाख रूपये.... आता माझ्याकड किती हाय... माझा खर्च जाऊन बघा किती राहतय .. अँपेडिक्सला तुमची संस्था चालुमध्ये देणार बस तुम्हाला बोलो होतो" अँक्च्युली ते साहेबच दिन झालेत "खालचे अशे टेबल एक दोन हायत.... ते टेबलवाली अशी मिळुन ते टेबलवाली पन्नास... चाळीस आणी ...ते दहा अशी म्हणत्यात.. त्या शिपाईला किती दिल होत तुम्ही" असे म्हणाले त्यानंतर क्लार्क पाटील, अनोळखी इसम व तक्रारदार यांचेत अनोळखी इसम यांचे कामा बाबत चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी "टोटल किती दयायचे एकदाच सांगा मला" असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "टोटल ... मला आता हे हिशोब दिलायच ....खर्च एवढा केलायच त्या खर्चा बाबत चर्चा झाली. त्यानंतर औसायकाचे मानधना बाबत चर्चा झाली. त्यानंतर अपेंडीक्स बाबत चर्चा झाली. त्यानंतर अनोळखी इसम यांनी, का तुम्ही एक ठरवा कि करायच किंवा न्हाय तेव्हा तक्रारदार यांनी बर निकाल साहेब म्हणजे असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "कुठला निकाल साहेबांना द्यायचा ओ... निकालासाठी ते साहेबांना द्यायच अस आहे ते" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी किती हाय ते असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "एक लाख" असे म्हणाले त्यांनंतर अनोळखी इसम यांनी तुमच काय तर पक्के करा एस किंवा नो, मग ते हात घालतील असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "काय व्हाय लागलय मी आडकणार हाय" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी किती सांगा म्हणजे मी काय असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "टोटल आता माग बोललोच होतो कि मी सांगीतलयच कि तुम्हाला आता सुरवात भेट झाली त्याचवेळी बोललोय कि...... एवढा दोन पर्यंत खर्च जाणार आहे तुमचा हाय म्हणुन" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी न्हाय न्हाय त्यांच किती म्हणताय वेगळ आणी किती वर द्यायच असे विचारल असता क्लार्क पाटील यांनी "वर द्यायच साहेबांना एक लाख रूपये ... खालच्या टेबललवाल्याला दिड लाख रूपये" "हा... आण

... आणी पन्नास हजार रूपये बाकिचा खर्च औसाईक ..ह्याला घेन अपिल तयार करन हे सगळ आम्हाला कुठ पन्नास हजारात हे होणार आहे तुमच सगळ .. तुम्ही स्वतः गेला असता तर वकिलाच पन्नास हजार रूपये द्यायला लागल असत" असे म्हणाले त्यानंतर क्लार्क पाटील व अनोळखी इसम यांनी मुंबई येथील कामा बाबत व वकिलाचे फि बाबत सांगुन क्लार्क पाटील तक्रारदार यांना मुंबई येथील कार्यालयातील कामाच्या पध्दती बाबत माहिती सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी तुम्हाला टोटल किती द्यायचे सांगा बर वरच आणी हिथल वरच लगेच द्यायला पाहिजे काय असे म्हणले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "त्यांना आता कस झालय..... आता मुळात आपल्याला ह्या तारखेला जायच किंवा न्हाय हे ठरवले पाहिजे" "कारण का रेकॉर्ड तयार करून जायाच आहे ते..... साहेबांच मला प्रशांत कांबळे एक तारखेला या" "एक तारीख मग ती वाढवुन घेतली अस न्हाय आता तिन रिजेक्ट केल कणी आपल्याला मग हायकोर्ट गेल्याशिवाय पर्याय न्हाय... अस आहे" "त्यान पहिल्या नोटीसाला सह्याला .....दहा हजार रूपये पाठवा म्हणला पहिला मग नोटीस काढतो" असे म्हणाले तेव्हा अनोळखी इसम यांनी "आओ त्याशिवाय ते ह्याच्याशिवाय घेत न्हायत.... पटलावर घेत न्हायत" असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "प्रशांत कांबळेन.... आता एक लाख रूपये मागतोय.... दुस-याच एका कामात.... तुमच्या पुढच हाय बघा हे आता.... हाय का ... प्रशांत" "हे पहिला करायच .... ते शब्द बोलत न्हायत.... तुम्ही गेला जाऊन या म्हणल ...तुम्हाला आकडा तर काढुन या...मी का जावा म्हणतोय त्यांना माझ्यावर शंका नको...ह्यो काय



Scanned with OKEN Scanner

वेगळ म्हणजे दोघ...हो आणी बाहेरच्या बाहेर काढतोय काय पैसे ..आणी सुपारी कोणाची घेत बि न्हाय...संबधीत हायत चार जण त्यांचच......रोहीत दादाच्या कामात एक मी लक्ष घातल होत मी ब-यापैकी" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी तुमच्या ऑफिसला किती दिल पाहिजे आता .... तुमच्या ऑफिसला आणी वर असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "ऑफिसला घेवुन हे करायला.... एक पाच हजारात होतय, ते काय मी... ह्यातनत कट करून घेणार हाय" "ह आता राहतोय विषय इलेक्शनचा ...ते तुमची संस्था चालु हुन आल्यावर हे आल्यावर इलेक्शनचा त्यो किरकोळ खर्च हाय त्यो इलेक्शनचा त्यो विषय वेगळा हाय त्याला आणी लई न्हाय खर्च त्याला आणी डिपॉझिट वगैरे भरायला लागतय ते नियमानी कायद्यातच हाय ना तुम्ही काय डिपॉझिट खर्च तुमच एक चार हजार चेक भरून देतोय आपण" "इलेक्शन मध्ये समजा काय हे झाल......म्हणजे साभासद सगळे बोलावतो......... म्हणजे त्यात अॅडजेस्टमेंटला हिकड तिकड मग त्यावेळी तुमच्या इच्छेने द्या त्यावेळी...... कारणा आपण सगळे सभासद बोलातले कि कोणतर म्हणणार इलेक्शन पुढ सगळी बोलवुन घ्यायची आसत्या ना" .. "मी गेल न्हाय तर कोणाला तर देतो ...... त्यावेळी तुमच्या इच्छेन त्यावेळी द्या त्यांना" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी टोटल सांगा ..म्हणजे मी तस घरात सांगतो एकदाच तुमच .. आणी ते वरच असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "तुमच काय तर ते इलेक्शनच बघा कि पंचवीस एक मध्ये करून टाकायच, सगळ इलेक्शन करून तुम्हाला देतो... म्हणजे तिथन वरन मंजुरी आणुन इलेक्शन करून तुमच संचालक मंडळ निवडुन देतो" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी आणी वरच...... आता किती द्यायला पाहिजे असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी आता वरच कस हाय.... किमान साहेबाच तरी एक लाख पाठवायला पाहिजे असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी आता कोण साहेब आले असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी जोगदंड असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी पहिले ते जास्त घेत नव्हते म्हणत होता ना तुम्ही पहिले साहेब असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "पहिले साहेब न्हाय त्याच आधिच साहेब देसाई साहेब होत ते लई भारी होत" असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी म्हणजे टोटल सांगा मला तस हे करायला पाहिजे असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "आणी आपण सगळ करून घेवुन ते...... म्हणजे मिळुन जाऊ आपण तिथ .....अ आपण त्याचवेळी दोनला ठरल होत आपल..." असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी पुन्हा किती म्हणुन विचारले असता क्लार्क पाटील यांनी "दोनला ठरवल होत" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी म्हणजे कुठल कुठल वरच असे म्हणाले असता क्लार्क पाटील यांनी "टोटलच कि ते.... अपिल मंजुर करून आणायचे दोन लाख रूपये" "आता इलेक्शनचा विषय वेगळा हाय आमच्या लिगलचा... ते तिथ दोन मध्ये तुमच माझ पण हितच घ्यायच करायला काय वरन चार....काय तुमच देतो चालु करून मी देतो" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी म्हणजे टोटल किती द्याला पाहिजे तुम्हाला असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "ते इलेक्शनचा वेगळा विषय हाय..... ते परत बोलु.... चालु करून आल्यावर आल का लक्षात...... आता मी काय हाय ह्याच्यात करून देतो .....तुमच दोन मध्ये ... आता तुमच एक लाखातल एक पोहचल न्हाय नंव्वदच पोहोचलेत" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी नंव्वदच पोहोचलेत....... ते त्यांनी घेतले ना .... मग आता एक्स्ट्रा किती द्यायचे वर असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "एक्स्ट्रा आता किती ... आता राहिलेल वरच आता राहिलेल वरच राहिल ....आत्ता वेळ हाय काय जाऊया काय चहाला" तेव्हा तक्रारदार यांनी नको...., मी कोल्हापुरला गेलो आणी तस इकड आलो...



Scanned with OKEN Scanner

टोटल मला सांगा म्हणजे ते सोडुन मला किती असे म्हणले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "हे बघा एक दिलेत तुम्ही" "आता एक द्यायला लागणार" असे म्हणले तेव्हा तक्रारदार यांनी अजुन किती असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी पुन्हा "एक" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी "एक लाख" असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "ह... "असे म्हणुन "त्या एक लाख मधल उत्तम आण्णांना काय बोलू नका... ते काय म्हणणार... ते का सांगीतल म्हणणार.... मी म्हणल परवा हे हाय यात होत न्हाय...... दोन मध्ये किती ते मला पहासष्ठ दिले.... पच्याहत्तर तुम्ही" असे म्हणले तेव्हा तक्रारदार यांनी त्यात होईल का..... दोन मध्ये असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "दोन मध्ये होतय.... ऑर्डर करून आणतो मी बोललोय काल परवा पण साहेबांबरोबर" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी म्हणजे विषय संपतोय ना त्यात असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "हा ..तुमच वरन संस्था चालु हुन येत्या विषय संपत न्हाय.... आडिच तिन मध्ये..... आडीच वर जातोय विषय आत्ता तसा" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी आडीच लाखावर असे विचारले असता क्लार्क पाटील यांनी "हा..... जातोय पण मी त्यांना सांगीतलय येवढ होणार न्हाय..... एवढ करा म्हणुन...... आज आणी फायनल बोलता"े "मला त्यांनी परवा काय सांगीतल...... आता हे बघा... तुम्ही हे खर्च तुम्हाला मी दाखवतो मला तुम्ही काय... पन्नास हजार रूपये बाहेर मागाय लागल्यात" "एक साहेबाच आणी ते पंन्नास....... हे त पन्नास वाढल कि...... आपल पंन्नास वाढल्यात ......तुम्हाला द्यायच वाढतय" "मी काय म्हणल सव्वा लाखात मिटवा विषय ..... म्हणजे हाय हे खर्चात दोन लाखात जुळतय ....आल का लक्षात हे ते खर्च ..जाणे येणे ते सगळ व्यवस्थ्ीत होतय..... मग अस मी बोललोय... माझ्या डोक्यान दोन मध्ये विषय संपवायचा आणी ऑर्डर आणायच ... ह आणी त्याच्या हिशोबान गेल .....ते वाढायला लागलय आडीच वर जाय लागलय .... मग मी आता दोन मध्ये मिटवतो ...आज आणी साहेबांना फोन करतो एवढ काय होत न्हाय ...मी आणी त्यांना म्हणल चर्चा करातो आणी संागतो" "किंवा त्यांना पाठवुन देतो तुम्ही बोला अस बोललोय साहेबांना .... प्रशांत कांबळे म्हणुन हाय तुम्हाला दाखवलय कि मगाशी" "अरे काय झालाय प्रॉब्लेम झालाय ओ हिथच करून दिल असत एक लाखाच्या आत झाला असता" असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी क्लार्क पाटील यांना चालतय.... सांगतो मग ...कॉल करतो असे म्हणाले तेव्हा क्लार्क पाटील यांनी "करा.... कोण कोण हाय ......एकटच हाय काय" असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी आ ...न्हाय मित्र हाय.... निघालोय शिराळाला असे म्हणुन कार्यालयातुन बाहेर आलो. त्यानंतर तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो " वगैरे हकीकत पंच नं. 1 श्री.ऋषिकेश राजगे यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.सुरेश पाटील यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच क्र.1 ऋषिकेश राजगे हे ऐकू येईल इतक्या अंतरावर हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री.विरंेद्र पाटील व लोकसेवक श्री.सुरेश पाटील यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.



Scanned with OKEN Scanner

पडताळणी कारवाई मध्ये, लोकसेवक क्लार्क पाटील सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज यांनी श्री.पुनेशर मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या कामकाज बंद असलेस संस्थेचा तक्रारदार यांना सभासद व्हायचे असल्याने त्यांनी सदर संस्थेचे चेअरमन व सभासद यांनी संस्था पुर्नजिवन करणे बाबत दाखल केले अर्जा बाबत पुर्नजीवन सुनावणी निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लागण्यासाठी मुंबईच्या कार्यालयातील जोगदंड साहेबांना, क्लार्क प्रशांत कांबळे व इतर यांना, तसेच मिरज कार्यालयातील स्टाफसाठी असे एकुण 2,50,000/- रुपये लागणार असल्याचे सांगुन तडजोडी अंती 2,00,000/- रुपये मध्ये पुर्नजिवन आर्डर काढुन काम करुन देण्याची तयारी दर्शवुन तक्रारदार यांनी यापुर्वी दिलेले 1,00,000/- रुपये रक्कम मिळाली असल्याचे सांगुन ती रक्कम वळीत करुन राहिलेली 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्याकरिता मुंबई येथील कार्यालयात संपर्क करुन बोलुन सांगत असल्याचे तसेच अनोळखी इसम याने लोकसेवक क्लार्क पाटील यांना तसेच मुंबई येथील कार्यालयात तक्रारदार यांना त्यांचे काम पुर्ण करुन घेण्यासाठी लाच देण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क यांनी पुर्नजीवन सुनावणी निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लागण्यासाठी प्रथम 2,50,000/- रुपये सांगुन नंतर 2,00,000/- रुपयाची मागणी करुन त्यातील 1,00,000/- रुपये मिळाले असल्याचे सांगुन 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन मुंबई येथील कार्यालयात संपर्क करुन बोलुन पुन्हा सांगत असल्याचे सांगितलेने लाच मागणी स्पष्ट करणेसाठी तसेच तक्रारदार यांना लोकसेवक क्लार्क पाटील यांना तसेच मुंबई येथील कार्यालयात त्यांचे काम पुर्ण करुन घेण्यासाठी लाच देण्यासाठी प्रोत्साहन देणारे अनोळखी इसम कोण आहे याबाबत लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क यांनी मुंबई येथील कार्यालयात संपर्क केले नंतर पुन्हा त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज कार्यालय यांनी संपर्क केल्यानंतर आम्हास तात्काळ संपर्क करण्याच्या तसेच झाले कार्यवाही बाबत गोपनीयता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले.

सदर ठिकाणी पंचनामा करणे गैर सोयीचे होत असल्याने व सदर बाबत गोपनीयतेचा भंग होऊ नये या करीता पुढील कार्यवाही करीता अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे येवुन पुर्ण केली.

दिनांक 04/09/2026 रोजी दिनांक 31/08/2026 रोजी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. विरेंद्र पाटील यांना लोकसेवक श्री.सुरेश पाटील यांची भेट घेवून लाच रक्कम कमी जास्त करणेबाबत जोगदंड साहेबांशी बोलणे झाले काय? व लाच रक्कमेचा आकडा फायनल करण्यासाठी सहा. निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) सांगली मिरज या ठिकाणी पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. विरेंद्र पाटील व वरील दोन्ही पंचांना संपर्क करून हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे पडताळणी पुर्व माहिती देवुन तयारी केली तक्रारदार व पंच नं 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणीपुर्व निवेदन नोंदविले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 14.29 सुरु करून तक्रारदार यांचे गळ्यामध्ये अडकवुन तक्रारदार व पंच नं 1 यांना लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क



Scanned with OKEN Scanner

यांची भेट घेणे करिता रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं 1 आमचे समक्ष हजर झाले असता. मी 15.18 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बदं करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री.ऋषिकेश राजगे यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार श्री. विरेंद्र पाटील असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून सहा. निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) सांगली मिरज येथे दाखल होवुन सुरेश पाटील यांना जावून भेटले. मी बाजुला थोडे अंतरावर लोकसेवक सुरेश पाटील व तक्रारदार यांचे संभाषण ऐकु येईल असे थांबून राहिलो.

त्यानंतर तक्रारदार विरेंद्र पाटील व लोकसेवक सुरेश पाटील यांचेमध्ये चर्चा सुरू झाली, त्यावेळी लोकसेवक सुरेश पाटील यांनी " काय सांगायच म्हणजे, रात्री सुध्दा लक्षात न्हाय फोन करायच साहेबांना" असे म्हणून त्यांनी प्रशांत कांबळे यांना कॉल केला. त्यावेळी सुरेश पाटील म्हणाले " नमस्ते साहेब ते, हयाच ओ परवा बोललेलो आकडा त्योच नव्ह का ते एक लाख घेतल न्हायत व्हय विषय संपवुन टाकु ना एका झटक्यात, आता पुढची तारखी हाय ना, बाकी काय आडचण न्हाय ना बघितला का दावा, जरा बघा की साहेब आणखी एकदा दावा नजरे खालण घाला, म्हणजे आलो की विषयच संपवुन टाकु"असे म्हणून त्यांनी कॉल कट केला आहे. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक सुरेश पाटील यांना विचारले की, काय म्हणाले साहेब असे विचारले असता, लोकसेवक सुरेश पाटील यांनी सांगितले की "मेन टेबलचे अधिकारी आणि प्रशांत कांबळे हे नोटिस व जजमेंट तयार करून साहेब सहया करत्यात त्यावर" असे म्हणाले. त्यानंतर सुरेश पाटील म्हणाले की, " ते दोघांचा पण विषय हाय ....मी बोललोय साहेबांशी, केलय थोड कमी, दहा विस हजार कमी केलय बघा "त्यावर तक्रारदार यांनी "एक म्हणलेत त्यातले" असे विचारले असता , सुरेश पाटील म्हणाले की, "न्हाई न्हाई, एक नव्हे दिड मधन एक दहा ते विस कमी घा म्हणल्यात" असे म्हणाले. " बघुया तस मी म्हणलोय त्याला, काय हाय आपला खर्च, जामीन,सगळा अंड झाल दोन मध्ये दोनच्या वर हयो विषय लई लांब जात होता, दोनमध्ये आपण सगळच करायच हाय आपल्याला " त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना प्रशांत कांबळे यांना कॉल केला असल्याचे व ते जजमेंट तयार करणार असल्याचे सांगितले.

तक्रारदार व लोकसेवक यांचेत निकालाच्या तारेखाबाबत व मुंबई येथे मेन ऑफिसला जाणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक सुरेश पाटील यांनी प्रशांत कांबळे यांना निकालाच्या तारखेबाबत विचारणा केली. त्यावेळी प्रशांत कांबळे यांनी तारीख पाहून सांगतो असे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांनी दि. 31/08/2026 रोजी कार्यालयात उपस्थित असलेली अनोळखी व्यक्ती यांचेबाबत लोकसेवक सुरेश पाटील यांना विचारले की "हे आता परवा होते ते त्यांच नाव काय ते, मुंबईला जात्यात म्हणल बघा" त्यावर लोकसेवक सुरेश पाटील म्हणाले की, "लोंढे साहेब, त्यांना घेवून जावा जाताना" त्यावर तक्रारदार यांनी विचारले त्यांच नाव काय संपुर्ण, ते तिथच असत्यात का" तेव्हा सुरेश पाटील " तिथ न्हायत.... ते इथ होते सांगलीतच, पण त्यांच पदोनताच होत ना डेअरीच, आणि हिथ आपल रिटायर्ड झालेत आता, हे काम बघतात वकीलांच्या बरोबर असतात, वकीलांच्याबरोबर जातात " " हे काम केलेल हाय त्यांनी ..... हे बी कस चार पैसे बी मिळत्यात वरच्यावर गेल .... तुमच्या सारख्याला वेळ नसतोय जायाच काम करायच चार पैसे राहत्यात " असे म्हणाले.



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये सुरेश लोंढे यांचे संदर्भात चर्चा झाली असून ते लोकसेवक सुरेश पाटील यांचे कार्यालयातच काम करीत होते व सध्या ते रिटायर्ड आहेत. सुरेश लोंढे हे चार पैसे मिळतात म्हणून अपीलाच्या तारखांना वकीलांसोबत मुंबई येथे जावून काम पाहत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर सुरेश पाटील यांनी तक्रारदार यांना "आता तुम्ही किती दिल्यात एक" असे विचारले असता तक्रारदार यांनी "एक दिल्यात हा " असे म्हणाले. त्यावर सुरेश पाटील यांनी "आणि एक दिले असते तर आपण विषय मार्गी लावला असता.... म्हणजे दीड मी त्यांना पाठवून दिले असते" असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना अपीलची तारीख कळविण्यास सांगून पुढच्या आठवडयात जाणार आहे त्यावेळी जातो असे म्हणून तक्रारदार व मी आमचेकडील वाहनाने तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 त्यांचे सोबत कार्यालयात हजर होते व सुरेश पाटील यांच्याशी झालेले संभाषण त्यांनी ऐकले व पाहिले असल्याचे सांगितले.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, तक्रारदार यांचे श्री. पुनोर मच्छिमारी सह. संस्था पुनवत ता.शिराळा याचा संस्था पुर्नजिवन करणे संदर्भात उप निबंधक सहकारी संस्था मत्स्य महाराष्ट्र राज्य मंुबई दाखल केले अपीलचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने लावून देण्यासाठी लोकसेवक सुरेश पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे वरिष्ठ अधिकारी यांचेकरीता 1,50,000/- रूपये व स्वतःकरीता 50,000/- रूपये असे एकुण 2,00,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच यामधील 1 लाख रूपये यापुर्वी दिले असल्याची कबुली देवून लोकसेवक सुरेश पाटील यांनी आणखी 1 लाख रूपयेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना लोकसेवक श्री.सुरेश पाटील यांनी सांगितलेप्रमाणे उप निबंधक सहकारी संस्था मत्स्य महाराष्ट्र राज्य मंुबई येथील वरिष्ठ अधिकारी प्रशांत कांबळे व जोगदंड साहेब यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी त्यांची मुंबई येथे जावून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

सदर ठिकाणी पंचनामा करणे गैर सोयीचे होत असल्याने व सदर बाबत गोपनीयतेचा भंग होऊ नये या करीता पुढील कार्यवाही करीता ॲन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे येवुन पुर्ण केली.

दिनांक 04/09/2026 रोजीचे पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार श्री.विरेंद्र किर्तीकुमार पाटील यांनी आम्हास दिनांक 09/09/2026 रोजी सकाळी 09.45 वा.चे सुमारास संपर्क करून उपनिबंधक सहकारी संस्था मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील क्लार्क श्री.प्रशांत कांबळे व त्यांचे अधिकारी श्री.राजकुमार जोगदंड यांना दिनांक 10/09/2026 रोजी भेटणेस जाणार असले बाबत सांगितले. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि.10/09/2026 रोजी सर्वजण एका सुरक्षित ठिकाणी एकत्र येवून भेट घेण्याचे सांगितले.

त्याअनुषंगाने दि.10/09/2026 रोजी मी, तक्रारदार विरेंद्र किर्तीकुमार पाटील यांना पंचासमवेत उपनिबंधक सहकारी संस्था मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मंुबई येथील कार्यालयात पाठवुन श्री प्रशांत कांबळे, क्लार्क व त्यांचे अधिकारी श्री राजकुमार जोगदंड यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी वर नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांना संपर्क करून त्यांना दि.09.09.2026 रोजी 15.00 वा



Scanned with OKEN Scanner

ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे वरील नमुद दोन्ही पंच हे दि.09.09.2026 रोजी 15.00 वा ॲन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर राहून त्यानंतर ते आमचेकडील स्टाफ असे शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो न्युओ नं.एमएच-10/ईव्ही-4685 मधून पुणेकरीता रवाना झाले. त्यानंतर दोन्ही पंच व स्टाफ असे दि.09/09/2026 रोजी 19.00 वाजता पुणे येथील ॲन्टी करप्शन कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर आम्ही रेस्ट हाऊस पुणे येथे मुक्काम केला.

त्यानंतर दि.10/09/2026 रोजी मी, दोन्ही पंच, स्टाफ आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो न्युओ नं.एमएच-10/ईव्ही-4685 मधून रवाना होवून मित्तल टॉवर विधानभवन मुंबई येथे सुरक्षित ठिकाणी दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार विरेंद्र पाटील यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार विरेंद्र पाटील हे आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे पडताळणी पुर्व माहिती देवुन तयारी केली तक्रारदार व पंच नं 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणीपुर्व निवेदन नोंदविले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 12.00 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे गळ्यामध्ये अडकवुन तक्रारदार श्री विरेंद्र पाटील व पंच नं. 1 श्री. ऋषिकेश बाबासाहेब राजगे यांना उपनिबंधक सहकारी संस्था, मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालय येथे लोकसेवक श्री प्रशांत कांबळे,लिपीक यांची भेट घेणेकरीता रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं 1 आमचे समक्ष हजर झाले असता. मी 12.26 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री.ऋषिकेश राजगे यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे उपनिबंधक सहकारी संस्था, मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडे रवाना झालो. त्यानंतर सदर कार्यालयातील प्रशांत कांबळे यांची भेट घेतली असता त्यांनी "तारीख हाय" असे विचारले तेव्हा तक्रारदार श्री पाटील म्हणाले "न्हाय कधी हाय तारीख" त्यावर लोकसेवक प्रशांत कांबळे म्हणाले "पंधरा ऑक्टोंबर तारीख हाय, ही नोटीस घ्या." असे म्हणून त्यांनी तक्रारदार श्री विरेंद्र पाटील यांना नोटीस दिली. त्यानंतर तक्रारदार विरेंद्र पाटील यांनी विचारले की, "कामाच कस कस हाय..प्रोसेस...कशी कशी हाय पुढ" त्यावर लोकसेवक कांबळे म्हणाले की, "तुमच ऑडीट वगैरे... "नाही नाही काय नाही, मी नाही बघत काम, साहेबांशी बोलले असतील" त्यावर तक्रारदार श्री पाटील म्हणाले "साहेबांना पेमेंटच बोललोय" त्यावर लोकसेवक कांबळे म्हणाले "नाही नाही काय नाही, तुमच ते झाल, होवून जाईल तुमच काम.. तुम्ही फक्त ऑडीट रिपोर्ट आणि या सगळया गोष्टी घ्या...ते करतील साहेब, माझ काय नाही माझ्याकडे येत नाही" त्यानंतर तक्रारदार श्री पाटील यांनी लोकसेवक श्री कांबळे यांना विचारले की, "साहेबांना भेटु ?" त्यावर लोकसेवक कांबळे म्हणाले "हा भेटा की जावा".

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री कांबळे यांचे वरिष्ठ अधिकारी श्री राजकुमार जोगदंड यांचे केबीनमध्ये गेले असता मी लोकसेवक जोगदंड यांचे कार्यालयाचे बाहेरच तक्रारदार व लोकसेवक जोगदंड यांचेमध्ये काय चर्चा होते हे ऐकण्यास येईल याप्रमाणे बसून राहीलो. लोकसेवक श्री जोगदंड म्हणाले "कोण सुरेश पाटील" त्यावर तक्रारदार श्री पाटील म्हणाले "सांगली ऑफिसचे...दुध च ऑफिस आहे मिरज येथे" असे म्हणाल्यानंतर लोकसेवक श्री जोगदंड म्हणाले की, "काय तिथे...त्याचा काय



Scanned with OKEN Scanner

विषय" त्यावर तक्रारदार म्हणाले की, "आता तारीख पडली आहे कायतर" त्यावर लोकसेवक जोगदंड म्हणाले की, "त्यांना सांगा साहेबांनी नोटीस काढलेली आहे" त्यानंतर तक्रारदार श्री पाटील हे केबीनमधुन बाहेर येवून ते व मी पुन्हा लोकसेवक प्रशांत कांबळे यांना भेटलो त्यावेळी तक्रारदार श्री पाटील म्हणाले की, "हं चालतय सांगतो म्हणाले तुम्हाला...बाकीच काय न्हाय ना... ते साहेब म्हणाले तुमच्यासंग बोला म्हणून" त्यावर लोकसेवक श्री कांबळे म्हणाले "नोटीस तेवढी घेवून जावा...कोण येईल" त्यानंतर तक्रारदार म्हणाले "घेवून जातो, पुढच्या ह्याच्यात काम होईल ना? तुमचा नंबर मिळू शकतो का ? त्यावर लोकसेवक प्रशांत कांबळे म्हणाले "नाही". त्यानंतर मी व तक्रारदार असे उपनिबंधक सहकारी संस्था, मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयातून निघुन आपले समक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1) ऋषिकेश बाबासाहेब राजगे यांनी सांगितली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये उपनिबंधक सहकारी संस्था मत्स्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील लोकसेवक श्री प्रशांत कांबळे व तेथील वरीष्ठ अधिकारी श्री राजकुमार जोगदंड यांनी तक्रारदार श्री विरेंद्र पाटील यांना ते सभासद होवू इच्छिणा-या श्री पुने□ार मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या संस्थेचे पुर्नजिवन करण्यासाठी त्यांचेकरीता लोकसेवक श्री सुरेश पाटील, क्लार्क सहा.निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध)सांगली मिरज कार्यालय यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केलेली नसलेचे निष्पन्न झाले आहे.

यावरुन लोकसेवक श्री सुरेश पाटील, क्लार्क सहा.निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध)सांगली मिरज कार्यालय हे वरीलप्रमाणे मुंबई येथील कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांची नांवे सांगून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता लाच रक्कम मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यामुळे लोकसेवक श्री सुरेश पाटील, क्लार्क सहा.निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध)सांगली मिरज कार्यालय यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे आम्ही निश्चित केले. त्यानंतर तक्रारदार श्री विरेंद्र पाटील यांना सदरबाबत गोपनियता राखण्याबाबत सांगून तक्रारदार यांना लोकसेवक श्री.सुरेश पाटील यांचा फोन आल्यास आमचेशी संपर्क करण्याबाबतच्या सुचना दिल्या.

सदर ठिकाणी पंचनामा करणे गैरसोयीचे होत असल्याने व सदरबाबत गोपनीयतेचा भंग होऊ नये या करीता पुढील कार्यवाही करीता मितल टॉवर नरिमन पॉईंट मुंबई येथील पार्किंग मध्ये येवुन पुर्ण केली.

दि.10/09/2026 रोजी मुंबई येथे केले पडताळणी कारवाई मध्ये उपनिबंधक सहकारी संस्था मस्त्य महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयातील लोकसेवक श्री.प्रशांत कांबळे व तेथील वरिष्ठ अधिकारी श्री.राजकुमार जोगदंड यांनी तक्रारदार विरेंद्र पाटील यांना ते सभासद होवु इच्छिणा-या श्री.पुने□ार मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या संस्थेचे पुर्नजिवन करण्यासाठी त्यांचेकरिता लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) सांगली मिरज कार्यालय यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केलेली नसलेचे निष्पन्न झाले आहे. यावरुन लोकसेवक श्री. सुरेश पाटील क्लार्क हे वरील प्रमाणे मुंबई येथील कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांची नांवे सांगुन स्वतःचे आर्थिक फायद्या करिता लाच रक्कम मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे निश्चीत केले.

दि.24/09/2026 रोजी मी व कार्यालयातील स्टाफ असे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.विरेंद्र



Scanned with OKEN Scanner

पाटील यांना संपर्क करुन लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क हे मुंबई येथील कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांची नांवे सांगुन स्वत:चे आर्थिक फायद्या करिता लाच रक्कम मागणी करत असल्याचे निष्पन्न झालेने लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क यांचेविरुध्द मिरज येथील कार्यालयात सापळा कारवाई आयोजित करण्याचे करण्याचे आहे असे कळविले असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क हे रजेवर असुन ते त्यांचे बागणी ता.वाळवा या गांवी असल्याचे माहिती त्यांना मिळाली असल्याचे त्यांनी सांगितलेने. तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील यांना लोकसेवक श्री. सुरेश पाटील क्लार्क यांचेविरुध्द त्यांचे राहते घरी सापळा कारवाई आयोजित करणेची असल्याने दुपारी 14.00 वा.चे सुमारास आम्ही आष्टा येथे येत असलेचे सांगुन आपण आष्टा येथे उपस्थित राहणे बाबत कळविले.

त्यानंतर मी सापळा पथक असे आष्टा येथे दाखल झालो तक्रारदार हे आष्टा येथे त्यांचे मित्र श्री.कदम यांचे सोबत दाखल झाले. त्यानंतर मी सापळा कारवाईच्या अनुषंगाने ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे सापळा पुर्व माहिती देवुन तयारी केली तक्रारदार व पंच नं 1 व तक्रारदार यांचे मित्र श्री.कदम यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सापळापुर्व निवेदन नोंदविले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 17.35 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे गळ्यामध्ये अडकवुन तक्रारदार व पंच नं 1 यांना लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क यांची त्यांचे बागणी येथील घरी भेट घेणे करिता रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं 1 आमचे समक्ष हजर झाले असता. मी 18.09 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री.ऋषिकेश राजगे यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार विरेंद्र पाटील, व त्यांचे मित्र कदम असे तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनामधुन रवाना होवून तक्रारदार यांनी त्यांची कार आष्टा ते वडगांव जाणारे रोडने घेवुन बागणी गावातील मुख्य चौकातुन पांढरमळा भागात एका घरासमोर तक्रारदार विरेंद्र पाटील यांनी त्यांची कार थांबविली त्यानंतर मी, तक्रारदार विरेंद्र पाटील व त्यांचे मित्र कदम असे समोरील घराकडे गेलो त्यानंतर तक्रारदार यांनी विचारले असता प्रथम एक मुलगा व त्यानंतर एक महिला बाहेर आली त्यांचे बोलण्यावरुन ते लोकसेवक सुरेश पाटील यांच्या पत्नी मुलगा असल्याची खात्री झाली त्याचेकडुन लोकसेवक सुरेश पाटील हे त्यांच्या गुडघ्याच्या त्रासावर दवाखान्यात फिजिओथेरपी घेण्याकरिता गेले असल्याचे व त्यांचा मोबाईल फोन त्यांनी घरात ठेवुन गेले असल्याचे सांगितले" वगैरे हकीकत पंच नं.1) ऋषिकेश राजगे यांनी सांगितली.

झाले एकंदरीत सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क घरी नसल्याने व त्यांचे नातेवाईक पत्नी व मुलगा यांचेकडुन लोकसेवक श्री.सुरेश पाटील क्लार्क यांच्या गुडघ्याच्या त्रासावर दवाखान्यात फिजिओथेरपी घेण्याकरिता गेले असल्याचे व त्यांचा मोबाईल फोन त्यांनी घरात ठेवुन गेले असल्याचे समजल्याने त्यांची भेट झाली नसल्याचे निष्पन्न झालेने आम्ही सर्वानुमते सापळा कारवाई मागे घेण्याचे निश्चीत केले.

त्यानंतर मी तक्रारदार यांचेकडील अँथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम 1,00,000/- रु नोटांचे बंडल पैकी तक्रारदार यांनी हजर केलेले 50,000/- रूपये तक्रारदार बदलुन त्याबदली दुस-या 50,000/- रुपये रक्कमेच्या नोटा त्यांना त्यांचे ताबेत दिले व उर्वरीत 50,000/- रु डमी नोटा माझे ताबेत घेतल्या.



Scanned with OKEN Scanner

सदर ठिकाणी पंचनामा करणे गैरसोयीचे होत असल्याने व सदरबाबत गोपनीयतेचा भंग होऊ नये या करीता पुढील कार्यवाही करीता अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे जाण्याचे निश्चीत करुन तक्रारदार श्री.विरेंद्र पाटील व श्री.कदम यांना सदर कारवाई बाबत गोपनीयता राखण्याची समज देवुन त्यांना पुढील कारवाई कामी संपर्क केले नंतर उपस्थित राहणे बाबत सुचना दिल्या. पुढील कार्यवाही करीता अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे येऊन पुर्ण केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुन्हा सापळा कारवाई आयोजित करुन लोकसेवक सुरेश पाटील यांची भेट घेण्यास पाठविणे करिता लोकसेवक सुरेश पाटील यांना संपर्क करणे करिता तक्रारदार यांना सुचना दिल्या असता तक्रारदार यांनी लोकसेवक सुरेश पाटील यांचा संपर्क होत नसल्याचे सांगितले तसेच तक्रारदार यांनी लोकसेवक यांचे कार्यालयातुन माहिती घेतली असता ते रजेवर असल्याचे त्यांना माहिती मिळाली तक्रारदार यांनी लोकसेवक सुरेश पाटील हे भेट घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे त्यांना वाटत असल्याचे सांगितले. यावरुन तक्रारदार हे लोकसेवक सुरेश पाटील यांचे मुंबई येथील कार्यालयात जाऊन तेथील अधिकारी व संबंधीत क्लार्क यांची भेट घेवुन आले नंतर तक्रारदार यांची भेट घेत नाहीत तसेच त्यांचा फोन उचलत नाहीत व तेव्हा पासुन ते रजेवर असुन ते तक्रारदार यंाचेशी कोणत्याही प्रकारे संपर्क करणेस टाळाटाळ करत असल्याने लोकसेवक सुरेश पाटील हे आता तक्रारदार यांची भेट घेवुन त्यांचेकडुन मागणी केलेली रक्कम स्विकारतील असे तक्रारदार यांना वाटत नाही.

झाले एकंदर पडताळणी व सापळा कारवाई वरुन लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध), सांगली मिरज यांनी आपले पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थिक फायद्या करिता मुळ तक्रारदार विरेंद्र पाटील यांना श्री.पुने□र मच्छिमारी सह.संस्था पुनवत ता.शिराळा जि.सांगली या कामकाज बंद असले संस्थेचा सभासद व्हायचे असल्याने त्यांनी सदर संस्थेचे चेअरमन व सभासद यांनी संस्था पुर्नजिवन करणे बाबत दाखल केले अर्जा बाबत पुर्नजीवन सुनावणी निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लागण्यासाठी मुंबईच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना, तसेच मिरज कार्यालयातील स्टाफसाठी असे एकुण 2,50,000/- रुपये लागणार असल्याचे सांगुन तडजोडी अंती 2,00,000/- रुपये मध्ये पुर्नजिवन आर्डर काढुन काम करुन देण्याची तयारी दर्शवुन तक्रारदार यांनी यापुर्वी दिलेले 1,00,000/- रुपये रक्कम मिळाली असल्याचे सांगुन ती रक्कम वळीत करुन राहिलेली 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे तसेच खाजगी इसम सुरेश लोंढे यांनी लोकसेवक क्लार्क पाटील यांना तसेच मुंबई येथील कार्यालयात तक्रारदार यांना त्यांचे काम पुर्ण करुन घेण्यासाठी लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. म्हणुन 1) लोकसेवक सुरेश पाटील क्लार्क सहा.निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), सांगली मिरज रा.बागणी ता.वाळवा जि.सांगली व 2) खाजगी इसम सुरेश लोंढे पुर्ण नांव पत्ता निष्पन्न नाही यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दी जबाब,



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** sandeep rangrao shinde **(पोलीस निरीक्षक) or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: RAHUL PANDURANG KSHIRSAGAR
Rank: HC (Head Constable)
Unique No: 92219396009001075
On: 10/16/2026 7:54:16 AM
At PS: Mahatma Gandhi Chowk, SANGLI

पोलीस स्टेशन ऑफीसर
महात्मा गांधी चौक,
पोलीस ठाणे मिरज

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sandeep rangrao shinde



Scanned with OKEN Scanner

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DGPSRSM8301

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with OKEN Scanner

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1976 | | | | चेचक: होय |
| 2 | पुरुष | 1966 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**



Scanned with OKEN Scanner